# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 13/09/2017 रोजी (का.प.क्र. 08) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 13 सप्टेंबर 2017 रोजी (का.प.क्र .08) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.45 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगरसचिव व संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
04. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
05. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
06. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
07. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
08. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
09. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
10. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
11. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम

श्रीमती किर्ती शिंदे : जेष्ठ पत्रकार गौरी लंकेश यांची हत्या करण्यात आली त्याचा निषेध करावा तसेच त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

मा.सभापती : ठिक आहे सर्वानी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

यावेळी दोन मिनिट उभे राहून स्व.गौरी लंकेश यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.राजगौरव वानखेडे : सातारा देवळाई येथील ग्रामपंचायतीतील 43 कर्मचारी मनपा सेवेत कशाच्या अधारे रूजू केले प्रकरण काय आहे माहिती दयावी.

उपआयुक्त-आस्थापना :सातारा देवळाई हा परीसर शासनाने अध्यादेश काढून मनपात सामावेश केला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 3-3 ब नुसार जे छोटे क्षेत्र मनपास समावेश होईल त्या ठिकाणचे सर्व प्रचलित असलेले कायदे व नियम व तेथील कर्मचारी मनपाच्या आस्थापनेवर घेणे त्यानुसार सदर कर्मचारी यांनी मनपा सेवेत आम्हाला घ्यावे व जे प्रचलित वेतनाचे दर आहे त्यानुसार घ्यावे अशी मागणी आयुक्त श्री. बकोरीया साहेब आसतांनाच केली होती त्यानुसार संचिका सादर करून हा प्रस्ताव 2016 मध्ये महासभेत ठेवून मान्यता दिली होती. त्या मान्यतेच्या अनुषंगाने 26 फेब्रुवारी 2017 मध्ये आयुक्तांनी या प्रकरणाला मान्यता दिली आणि आदेश तयार करून परवाच्या दिवशी ते आदेश निघाले.

श्री.राजगौरव वानखेडे : महासभेचा ठराव क्र.540 आहे त्यात असे दिले की वार्ड अधिकारी यांनी पाठविलेल्या अहवालानुसार सातारा देवळाई येथील विविध संवर्गातील 43 कर्मचारी यांचे विवरण पत्र सोबत जोडले आहे.त्यांना असलेल्या पदावर व देत

असलेल्या वेतनावर मनपात सामावून घेणे बाबत होते.परंतु आता तसे न करता त्यांना जे वेतन कायमस्वरूपी कर्मचारी यांना दिले जाते त्याप्रमाणे घेतले ठराव झाला त्यापासून आर्थीक फायरे एरियस पोटी 1.17 कोटी देणार असे समजते त्या खर्चास स्थायी समितीची मान्यता लागते ती घेतली नाही. आतापासून लागू केल्यास 1.17 कोटी मनपाचे बचत झाले असते. यास शासनाची परवानगी लागते का?

उपआयुक्त-आस्थापना : ॲक्ट मध्येच तरतुद करून दिली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :नांदेड-वाघाला महापालिका झाली तेंव्हा जिल्हा परीषदेचा भाग वगळून काही गांवाचा समाविष्ट केले यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविला त्यास शासनाची मान्यता झाल्यानंतर कार्यवाही केली यात तसे झाले नाही. सर्व मनपास नियम सारखे आहे.शासनाची मान्यता का घेतली नाही.

उपआयुक्त-आस्थापना :शासनाच्या परवानगी आवश्यकता नाही.

श्री.राजगौरव वानखेडे : त्यांचेवर अन्याय व्हावा अशी आमची धारणा नाही. त्यांची शैक्षणिक अर्हता होती का मनपामध्ये 20-25 वर्षापासून कर्मचारी दैनिक वेतनावर कार्यरत आहे त्यांचेवर का अन्याय होत आहे.एकाला एक न्याय दुस-याला दुसरा न्याय असे का आकृतीबंध मध्ये घेतले परंतु त्यांनाही यांचेप्रमाणे नियुक्ती दयावी. शासनाची परवानगी का घेतली नाही यात सात लोक दैनिक वेतनावर आहे दैनिक वेतनावरील कर्मचारी यांना घेऊ नये असे शासनाचे निर्देश असतांना सेवेत का घेतले.

उपआयुक्त-आस्थापना : 2003 चा शासन निर्णय आहे की शासनाच्या परवानगी शिवाय दै.वेतनावर घेऊ नये.सातारा देवळाईचे अस्थापनेवर कायम होते त्यांना घेतले जे दै.वेतनावर होते ते दै.वेतनावर आहे.जे कायम आहे त्यांचे सर्वीस बुक सह रेकॉर्ड आहे.त्यांची सेवापट व शै.पात्रता तपासले.

श्री.रेणुकादास वैद्य :नियमात तरतुद आहे म्हणून राज्य शासनाची परवानगी लागत नाही असे म्हणणे कितपत योग्य आहे जागा भरतीचे अधिकार आहे नियमामध्ये प्रोव्हीजन नाही असे असेल तर शासनाची मजूंरी लागत नाही का? ते कर्मचारी मनपा सेवेत समावेश करून घेणे आवश्यक होते याबध्दल दुमत नाही सर्वसाधारण सभेचा ठरावाच्या पुढे जाऊन.अगाऊ कार्यवाही केली सातारा देवळाई ग्रामपंचायत मध्ये त्यांना वेतन काय आता काय वेतन देतो उदया याचे ऑडीट पॉईन्ट निघू शकतो चुकीचे झाले तर याचा त्रास संबधीत अधिकारी यांना होईल यांची दखल घ्या,म्हणजे चुका करायच्या प्रशासनाने व महापालिकेला बदनाम करायचे हे योग्य नाही. कुणाच्या तरी सांगण्यावरून संचिका तयार होते लगेच कुठे तरी काना कोपऱ्यात बसून सही घेतली जाते अशी सिस्टम येथे सुरू झाली.1.27 कोटी अतिरिक्त खर्च त्यांना फरकापोटी दयायचा असे होत असतांना स्थायी समितीची मंजूरी घेतली नाही.त्यांची शैक्षणिक अर्हता काय नियमाची पायमल्ली होऊ नये याची दखल घेतली घ्यावी.जी बी समोर वेगळाच प्रस्ताव आणायचा मंजूरी देतांना दुसरी दयायची नियुक्त्ी करतांना तिसरेच आदेश दयायचे हे योग्य नाही.भविष्यात आयुक्तासह खालचे अधिकारी व कर्मचारी यांना हे प्रकरण धोकादायक होऊ शकते. आताच निलंबीत अधिकारी कामावर घेतले त्यांचेवर जी वेळ आली होती ती कुणावर या प्रकरणामूळे येऊ नये हे सर्व नियमानुसार व्हावे पुन्हा तपासणी व्हावी योग्य असेल तर ठिक आहे. आमची हरकत नाही.

श्री.अजीम अहेमद : तीन कर्मचारी 25 वर्षापासून मजूराचे काम करतात त्यांना पात्रता असून पदोन्नती दिली नाही. नियमात बसत नाही असे म्हटले यांना कसे घेतले.यांची पात्रता होती का

उपआयुक्त-आस्थापना : मजूरांना एस आय करता येत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे : सातारा देवळाईचे कर्मचारी आरक्षणानुसार भरती केले का ?

उपआयुक्त-आस्थापना : 397 पदे रिक्त आहे आरक्षणानुसार त्यांना बसविले जाईल.एरियस दयायचे असे आदेशात नमुद नाही त्याबाबत कार्यवाही काहीच नाही.

श्रीमती शेख नरगीस : 43 कर्मचारी कायम केले त्याची यादी दयावी.

मा.सभापती : सर्वसाधारण सभेचा असा ठराव नाही स्थायी समितीला विश्वासात घेतले नाही डायरेक्ट प्रमोशन दिले जाते योग्य नाही या प्रकरणाची प्रशासनाने सर्व चौकशी करावी एरीयस देणे संदर्भात स्थायी समितीची मंजूरी शिवाय देण्यात येऊ नये कोणते कर्मचारी यादी तसेच त्यांची शैक्षणिक अर्हता होती का नियमानुसार त्यांना अशी नियुक्ती देता येते का सर्व तपासणी करून अहवाल सादर करावा

श्री.रेणुकादास वैद्य : आज मला मालमत्ता कराची डिमांड नोटीस मिळाली मागिल कर माझ्याकडे थकीत नाही 1-4-2016 ते 30-9-16 व 1-10-16 ते 31-3-17 ची अशी दोन टप्प्यामध्ये पैसे भरावयाचे आहे. पहिले सहा महिण्याचे देयक हे 30 जुन पुर्वी व दुसरे सहा मिहिण्याचे बील 31 डिसेंबर पुर्वी भरणे आवश्यक आहे जर या मुदतीत रक्कम भरली नाही तर नियमानुसार 2 टक्के शास्ती पोटी रक्कम भरावी लागेल असे म्हटले परंतु मला बील आज मिळाले असे असेल तर मला जी शास्ती लावली ती रू 149 ही रक्कम मी का भरायची असा प्रश्न येतो माहिती घ्यावी.

कर निर्धा.व संकलक : नियम 41 नुसार थकीत बिलावर शास्ती लावत असतो.

श्री.रेणुकादास वैद्य : नोटीसा उशीरा देणार जे प्रामाणिकपणे कर भरतात त्यांना हा दंड लावणार असे दिसते.जे भरीत नाही त्यांचे बाबतीत काहीही करीत नाही.

कर निर्धा.व संकलक :आता 6 वार्डचे 9 वार्ड झाले असे असतांना दोन लक्ष डिमांड नोटीस तयार करून प्रत्येक वार्डासाठी दिले ही बीले 30 जून पुर्वी दयावी असे वार्ड अधिकारी यांना सांगितले आहे.5-10 टक्के बिले गेली नसेल तसेच वेबसाईटवर प्रत्येक प्रॉपटीचे किती कर आहे हे दिलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : अधिकारी त्यांची जबाबदारी पार पाडणार नाही. डीमांड नोटीस देणार नाही कशासाठी पगार घेता यातील दोन टक्के लावलेली शास्ती वगळण्यात यावी. 30 तारखेपर्यंत भरले नाही तर व्याज लावावे. डिमांड नोटीस देतांना शास्ती लावून बिल देणे योग्य नाही.

कर निर्धा.व संकलक : जो मुददा उपस्थित केला तपासणी केली जाईल. काही बिले राहिले असतील.

श्री.राजगौरव वानखेडे : जे वेळेवर पैसे भरतात त्यांना या मूळे त्रास होणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : जे कर भरतात ते स्वत:हून येणारे नागरीक आहे सुज्ञ नागरीक कर भरतात यांचे सांगण्यावरून कुणी येत नाही. 2 टक्के शास्ती लावण्याचा कॉलम उडवावा बील वेळेवर मिळणार नाही व दंड लावणार असेल तर योग्य नाही.

मा.सभापती :डिमांड नोटीस वेळेवर पोहचविणे आवश्यक आहे वेळेवर नोटीसा जाणार नाही शास्ती लावणार हे योग्य नाही. जे मुददे उपस्थित केला त्यांची तपासणी करावी व 2 टक्के शास्ती लावण्यास स्थगिती देण्यात येते तसे वार्ड अधिकारी यांना पत्र देऊन कळविण्यात यावे कर भरण्याची मुदत संपल्यानंतर शास्ती योग्य वाटते.

श्री.सयद मतीन : पोलीस मेस ते कटकटगेट व कटकट गेट रोषणगेट शहाबाजार ते मनपा मुख्यालय हे रस्ते 100 कोटीच्या रस्त्यामध्ये घेतलेले आहेत का ?

शहर अभियंता : यादी जी जाहीर केली शासनाने मंजूरी दिली त्यात या रस्त्याचा समावेश नाही

श्री.सयद मतीन : मा.सभापती यांनी निर्णय दिला होता. तसेच मा.महापौर यांनाही आमच्या पक्षाच्या वतीने हे रस्ते 100 कोटीच्या रस्त्यात समावेश करणे बाबत निवेदन दिले मा.महापौर यांनी म्हटले की हा रस्ता समावेश केला. हे रस्ते त्या यादीत आले का?

मा.सभापती : 100 कोटीच्या रस्त्याचे कामाच्या किती निविदा काढणार आहे.

शहर अभियंता : यात 100 कोटीमध्ये किती निविदा करायच्या विचार चालू आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : मनपाचे काही मॅनवल आहे का साधारण पणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मॅनवल वापरतो.शासनाची प्रशासकीय मान्यता झाल्यावर त्या कामाला एकत्रिकरण व विभाजन करता येत नाही.असे मॅनवल मध्ये उल्लेख आहे.शासनाने 100 कोटीच्या रस्त्याला मान्यता दिली. एकतर 31 रस्ते पुर्ण घेऊ शकतो किंवा 100 कोटीचे एकत्रित टेंडर करू शकतो पेपरला अशा बातम्या येतात की 50 कोटीच्या मागे डिफरचे रस्ते घेऊ, असे होऊ शकत नाही मनमानी होऊ नये.शासनाचे नियमाने काम करावे.

शहर अभियंता : शासनाच्या नियमाने काम करणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : प्रशासकीय शासकीय मान्यता झाली त्यांचे विभाजन करता येत नाही.100 कोटीचे टेंडर काढणार त्या बरोबर 50 कोटीचे डिफरचे कामे घेणार त्यास सभेची मान्यता लागणार की नाही सर्व माहिती दयावी.

शहर अभियंता : शासनाकडून पैसे येणार आहे, निविदा निघेल त्यानंतर पैसे येतील असे आहे शासनाची प्रशासकीय मान्यता झाली आहे निविदा करता येतील टेंडर किती करायचे हे आपण सर्वानी मिळून ठरवायचे आहे.

श्री.अजीम अहेमद : रस्त्याची यादी अंतीम केली आम्हाला विश्वासात घेतले नाही.

शहर अभियंता : शासनाचे नियम व मॅनवल विचारात घेऊन कार्यवाही करू निविदा प्रक्रिया करण्याची तयारी चालू आहे.1-2 किंवा किती टेंडर करायचे या बाबत शासनाचे प्रचलित नियम विचारात घेऊन प्रशासन त्यामध्ये सर्वानुमते निर्णय घेणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : 24 कोटीचे काम एकाच ठेकेदारास दिले त्याचा सर्वांनाच त्रास झाला 100 कोटीचे एकच टेंडर काढता येते किंवा 31 रस्त्याचे एकाच टेंडर मागविता येईल.टेंडर करतांना अटी शर्ती स्थायी समिती समोर आणाव्यात.या समितीला अंतिम करू दयावे.

शहर अभियंता : पारदर्शक काम होईल.अटी शर्ती बाबत या समितीकडे आणले जाईल.

मा.सभापती : या संदर्भात मा.मुख्यमंत्री महोदय यांना भेटलो होतो मा.महापौर ही सोबत होते त्यावर पीएमसी व इतर निविदा काढणेची कार्यवाही सुरू केली असे सांगितले 50 कोटीची कामे डिफर पेमेंन्टवर करणार आहे असे मा.महापौरांनी सुचविले त्यावर मा.मुख्यमंत्री महोदय यांनी 100 कोटीची चांगली कामे करावी आणखी 100 कोटी देऊ असे म्हटले माझे माहिती प्रमाणे 100 कोटी आणखी मिळतील डिफर मध्ये आताच सदस्यानी सुचविले नुसार दोन रस्ते घेऊ तसे मा.महापौरांनी म्हटले आहे.

शहर अभियंता : नवीन दोन रस्त् घ्यायचे असेल तर तांत्रिक प्रशासकीय मान्यता लागेल मा.महापौर यांनी सांगिले असेल तर दोन रस्ते सभेच्या मान्यतेनुसार घेतले जाईल.

श्री.अजीम अहेमद : मा.महापौर यांनी हे रस्ते घेतले असे सांगितले.

मा.सभापती : 100 कोटीची रस्त्याची यादी दिली आहे 50 कोटीचे डिफरचे रस्ते घेणेसाठी मनपाने आपल्या आर्थीक बाबी तपासाव्यात असे सुचविले आहे.सदस्याची भावना लक्षात घेता यादी तयार करण्याचे चालू आहे 150 कोटीची जी यादी आहे त्यानुसार कार्यवाही करता येईल, स.सदस्यांनी सूचना केल्यानुसार विरोधी पक्ष नेता यांचेशी चर्चा केल्यानंतर कटकट गेट ते पोलीस मेस कटकटगेट व जे रस्ते सुचविले ते रस्ते घेण्याचा प्रयत्न करू.

शहर अभियंता :अबरारकॉलनी ते कटकटगेट व्हाया पोलीस मेस रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करून व प्रशासकीय मान्यता घेतली जाईल.

मा.सभापती : कटकटगेट ते पोलीस मेस पर्यत रस्ता डांबरीकरण करणेसाठी मंजूर आहे तो व्हाईट टॅपींग करण्यासाठी आणखी रक्कम टाकून तशी कार्यवाही करता येइल.

श्री.सयद मतीन : चार वेगळे टेंडर 100 कोटीच्या कामाचे होऊ नये एकत्रित टेंडर काढावे यातून जुन्या शहरातील 20 कोटीचे सुध्दा रस्ते नाही.आताच मी उल्लेख केल्यानुसार किमान दोन रस्ते घ्यायला पाहिजे.

श्री.राजगौरव वानखेडे : भुमिगत गटार योजने बाबत अनेक वेळा चर्चा झाली निर्णय धेतले गेले.त्यावर प्रशासनाने कार्यवाही केली नाही. काहीच त्रृटया नसतील काम व्यवस्थीत असेल तर तसे प्रशासनाने सांगावे.

मा.सभापती : खुलासा करावा.

श्री.रेणुकादास वैद्य : योजनेचे काम श्री.सिध्दीकी यांचेकडे आहे आता डीपी कुलकर्णी यांचेकडे कशासाठी दिले.जे पुर्वीपासून काम करीत आले त्यांचेकडेच ठेवावे.

अति.आयुक्त : आतापर्यत श्री.सिध्दीकी काम करीत होते त्यांनीच ते काम पहावे अफसर सिध्दीकी खुलासा करतील.

श्री.राजगौरव वानखेडे : आयआयटी पवई यांचेकडे चौकशीला देण्याचे निर्णय घेतला होता कार्यवाही केली नाही तसेच या योजनेचे ऑडीट व्हावे तो निर्णय प्रशासनाने घेतला नाही.

मा.सभापती : भुमिगत योजने बाबत अनेकदा चर्चा झाली निर्णय सभागृहाने घेतले प्रशासनाने काय कार्यवाही केली

अति.आयुक्त : काही बाबतीत स्थळ पाहणी केली पाण्याचे ऑडीट या स्कीमचे बाबतीत माझेकडे डिटेल अशी माहिती येत नाही. अभियंता यांचे निगरानी खाली काम होते.

श्री.राजगौरव वानखेडे : आयुक्त म्हणून अति.आयुक्त सभेत असतात जे निर्णय सभेत होतात त्यांची अमलबजावणी करीत नाही का संबधीत विभागाकडून माहिती घेऊन एकत्रित घेत नाही का ?

अति.आयुक्त : विभाग प्रमुखाला सुचना केल्या जातात माहिती घेतली जाते अहवाल मागविला जातो.

कार्य.अभियंता-ड्रेनेज : आयआयटी पवईला या संदर्भात पत्र दिले आहे पाठपुरावा करीत आहे फोन वरून संपर्कात आहे नागपूर ऑडीट करण्याचे पाठपुरावा चालू आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :भुमिगत योजने बाबत शासन व इतर स्तरावर ज्यांना कुणाला माहिती दिली असेल त्यांची प्रत मला देण्यात यावी.

मा.सभापती : प्रत माझ्याकडे देण्यात यावी.

श्री.राजगौरव वानखेडे : या योजनेवर देखभाल दुरूस्तीचा किती खर्च होणार आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज : योजनेचे काम संपणार त्यानंतर ट्रायल घ्यावे लागणार तीन महिणे पेमेन्ट दयावे लागणार नाही 10 वर्षाचा करार करून त्यात 10 वर्षासाठी 64 कोटी खर्च आहे जे की वर्षाला सहा कोटी होत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : या योजनेसह दर महिण्याचा विविध योजनेच्या माध्यमातून महापालिकेला दर महा एक्स्पेडींचर खर्च हा 14-15 कोटी होत आहे तेवढे उत्पन्न मनपास येत नाही एसटीपीसाठी किती ठिकाणी जागा खरेदी केल्या किती रक्कम दयावी लागली. सभेची मान्यता घेतली का?

कार्य.अभियंता-ड्रेनेज : एसटीपी साठी तीन ठिकाणी जागा खरेदी केल्या पडेगाव येथील जागेस स्थायी समितीची मान्यता घेतली होती.इतर दोन ठिकाणची मान्यता प्रशासकीय घेतली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : सभेची मान्यता घेतली नाही कोणत्या दराने रक्कम देण्यात आली. व संबधीत ठेकेदारास आता कोणत्या दराने रक्कम देणार आहे.

कार्य.अभियंता-ड्रेनेज : दि.30-11-2016 च्या बैठकीत तसा प्रस्ताव दिला होता ठेकेदारानी जागा घेतली त्यांना पैसे अदयाप दिले नाही महापालिकेला पैसे दयावे लागेल.कोणत्या दराने रक्कम दयायची ते नगररचना विभाग ठरविली करंटरेटने पैसे दयावे लागणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : सन 14-15 चे दर 1 कोटी असेल तर आता 40 टक्के रेडीरेकणरच्या दरात वाढ झाली. तेवढी रक्कम त्या ठेकेदारास देणार काय?

श्री.रेणुकादास वैद्य : त्यावेळी महापालिकेकडे आर्थीक नियोजन होत नव्हते म्हणून ठेकेदारास जागा घेण्याची मुभा दिली असेल प्रोसेस करून काम करण्यात आले ठेकेदाराची चुक असेल व त्यात मनपाचे नुकसान होणार असेल तर त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे : मनपाची तेथे एसटीपी साठी जागा उपलब्ध नाही हे डीपीआर तयार करतांना माहित होते तर डीपीआर तयार करताना त्यात जागा घ्यावी लागेल असे का टाकले नाही. यावरून असे दिसते की ठेकेदाराच्या सोयीसाठी हे सर्व केले का ही 100 टक्के योजना फेल आहे. अनेक ठिकाणी बदल करण्यात आले.जागा घेणेमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला आजच्या रेटने त्या ठेकेदारास पैसे दयावे लागणार आहे.

कार्य.अभियंता-ड्रनेज :डीपीआर तयार करतेवेळी तीन ठिकाणी जागा लागणार हे टी पी विभागास कळविले होते वेळीच कार्यवाही झाली नाही.

मा.सभापती : स.सदस्य यांनी ज्या सुचना केल्या त्याची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी

श्रीमती संगीता वाघुले : मनपाच्या शाळोतील विदयार्थ्यांना गणवेश देणेबाबत तीन महिण्यापासून पाठपुरावा करीत आहे अदयाप पर्यत उत्तर मिळाले नाही.

शिक्षणाधिकारी :12500 विदयार्थ्यासाठी शासनाचा निधी आहे शासन जी आर नुसार कार्यवाही होईल संचिका आयुक्ताकडे सादर केली आहे.महापालिकेचा जो 24 लक्ष निधी 6500 विदयाथ्यासाठी आहे त्या बाबतीत थोडीशी शिथीलता आणण्यासाठी संचिका सादर केली जो निर्णय येईल त्यानुसार कार्यवाही होईल.

श्रीमती संगीता वाघुले :प्रत्येक पालकाकडून 400 रू घेण्याचे काही आदेश काढले होते का एन-7 च्या शाळेत पैसे जमा करीत आहे.याचा पुरावा माझ्याकडे आहे.

शिक्षणाधिकारी : तसे आदेश काढलेले नाही फक्त अकाऊंट ओपन करण्याचे व पालकाने आधी गणवेश घेणे आवश्यक आहे.

श्रीमती संगिता वाघुले : मनपाने अकाऊंड ओपन करुन दयावे गरीब विदयार्थी आहे ते अकाऊंड ओपन करण्यासाठी कोठून पैसे आणतील याचा विचार करावा.

उपआयुक्त(प्र.) :सर्व शिक्षा अभियानच्या माध्यमातून 400 प्रत्येक विदयार्थ्यासाठी निधी येतो त्यासाठी आता शासनाने त्या पाल्याच्या आईच्या किंवा पालकाच्या नावाने अकाऊंट उघडून त्यांचे नावे ते 400 रूपये गेले पाहिजे असे आदेश काढले व त्यापुर्वीच

त्यांनी पावती व गणवेश दाखवला पाहिजे.त्यानंतर 400 रू धनादेश दिला जाईल.या विदयार्थ्या व्यवतिरिक्त खुल्या सवंर्गातील व बीपीएल असलेल्या विदयार्थ्यांना मनपा गणवेश देईल ती संख्या 6532 आहे त्यामध्ये शिथीलता आणून प्रोसेस कार्यवाही होत आहे शासनाने धनादेश दयायचा आहे असे म्हटले. 400 रूपये कशाचे घेत आहे याची चौकशी होईल.

मा.सभापती : या बाबत चौकशी करावी व दोन दिवसात अहवाल सादर करावा शासनाच्या नियमानुसार कार्यवाही करावी.

शिक्षणाधिकारी : शासनाचा निधी जो आहे त्या बाबतीत खाते उघडून तर पैसे देता येतील मनपाच्या फंडातून जो 6532 विदयार्थ्यासाठी निधी दयायचा त्या बाबत योग्य तो निर्णय या सभेच्या मान्यतेने घेऊ शकतो संचिका प्रशासनाकडे दिली आहे. 50 टक्के विदयार्थ्यानी खाते उघडले आहे.

मा.सभापती : कमीत कमी पैशामध्ये खाते कसे उघडता येईल यासाठी बँक मॅनेजर यांचेशी आयुक्तांनी चर्चा करून योग्य ती कार्यवाही करावी व योग्य तो मार्ग काढावा.

श्रीमती संगिता वाघुले : एन -7 शाळेत आधार कार्ड काढण्यासाठी मशीन पाठविले होते कार्यवाही केली नाही आधार कार्ड असल्याशिवाय खाते उघउले जात नाही शुन्य बॅलेन्सवर खाते ओपन करावे.

श्री.सयद मतीन : वारंवार फोन करून अधिकारी फोन उचलत नाही.आधार कार्ड मशीन पाठवित नाही. कार्यवाही करावी.

शिक्षणाधिकारी : विदयार्थ्यांचे आधार कार्ड पालकांचे आधार कार्ड शिवाय पॅन कार्ड सुध्दा लागते.

मा.सभापती : उपआयुक्त यांनी या सर्व प्रकरणाची चौकशी करावी दोन दिवसात माहिती सादर करावी विदयार्थ्याचे आधार कार्ड व इतर कागदपत्र काढण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.सिध्दांत सिरसाट :राहूलनगर येथील शाळेच्या तीन रूम बंद आहे स्लॅब पडलेला आहे विदयार्थ्यांना बसण्यास जागा नाही.

मा.सभापती : उपआयुक्त प्र., शिक्षणाधिकारी स.सदस्य व मी स्वतः या ठिकाणी प्रत्यक्ष उदया 10-30 वा. पाहणी करू.

श्रीमती किर्ती शिंदे : बडीगिरणी येथील शाळेची इमारत जुनी झाली आहे ती पडण्याच्या अवस्थेत आहे. इमारतीची पाहणी करावी नव्याने काम करण्यात यावे.

मा.सभापती : या शाळेसह सर्व मनपाच्या शाळाचे इमारतीचे शहर अभियंता यांनी टेक्नीकली तपासणी करावी. जेथे दुरूस्ती व नव्याने काम करणे आहे तशी बजेट मध्ये तरतूद करावी.

श्री.राजगौरव वानखेडे : सीएसआरच्या माध्यमातून काही शाळेचे काम करावे तसेच शासनाकडे 83 कोटी शाळेचा अनुदान पोटी येणे आहे त्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमून तो निधी आणावा.

मा.सभापती : स.सदस्य यांनी जी सुचना केली त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा.

श्री.सिध्दांत सिरसाट : रेल्वेस्टेशन येथील मस्जीद जवळील पेट्रोलपंप असलेल्या जागेत अतिक्रमण झाले ती जागा मनपाने विकत घेतली आहे. कार्यवाही करणे बाबत सुचविले होते केली नाही. श्री.निकम यांना या बाबत कार्यवाहीचे आदेशीत केले होते.

उपआयुक्त -प्रशासन : हा विषय अतिक्रमण विभागाचे संबधाने आहे पानदरीबा व रेल्वेस्टेशन रोडवरील मस्जीद बाबत कार्यवाही करण्याचे आदेशीत होते

श्री.सिध्दात सिरसाट :2016 मी पत्र दिले होते सर्व कागदपत्र सोबत दिले होते कार्यवाही करणार होते केली नाही अधिकारी व त्या मालकाचे आर्थीक सेटलमेन्ट केले काय? का

कार्यवाही होत नाही. आयुक्त बकोरीया यांनी अधिकारी यांना असे सांगितले की या पेट्रोल मालकास जागा दयावी लागेल तर तो पेट्रोल पंप शिफ्ट होईल. परंतु ती जागा मनपाने वर्क्फ बोर्डकरून 3.50 लक्ष मध्ये विकत घेतली त्यापुर्वी तेथे पेट्रोलपंप होता पेट्रोल पंप साठी जागा देण्याचा प्रश्न येत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : अधिकारी कार्यवाही करीत नाही भ्रष्टाचार होतो म्हणून कार्यवाही थांबविली काय असे सदस्यांना म्हणावे लागते.बैठक झाल्यानंतर आजच्या आज कार्यवाही करावी.

अति.आयुक्त : अतिक्रमण प्रमुख व नगररचना विभागाशी चर्चा करून कार्यवाही केली जाईल.

उपअभिंतय(तांत्रिक ) : रेल्वेस्टेशन येथील मस्जीदच्या बाजूची जागा ही मनपाने वर्क्फ बोर्डकडून हस्तातरीत केलेली आहे स.सदस्यांनी जी कागदपत्रे व पत्र दिले त्या संबधीची कार्यवाही करण्याचे उपआयुक्त प्रशासन यांना आदेशीत केले आहे.

मा.सभापती : जागा मनपाची आहे अतिक्रमण केले आहे ते तातडीने काढावे.आयुक्तांचे नेमके आदेश काय होते स्पष्टीकरण करावे.

विधी सल्लागार : या आदेशात असे म्हटले की मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील आदेशाची प्रत मनपाने रेल्वेस्टेशन येथील न.भु.मा. क्रमांक 19080 मध्ये संपादीत केलेल्या जागेच्या खरेदी खताची प्रत तसेच दिं.5-2-98 ठराव क्रमांक 251/ 12 नुसार स्थायी समितीने घेतलेल्या ठरावाची प्रत 2-9-1997 ला सर्वसाधारण सभेत 77/7 च्या ठरावाची प्रत झालेल्या ठरावाची भाडेकरू शेख इस्माईल शेख अब्दुला यांनी दिलेल्या हमी पत्राची प्रत तसेच अध्यक्ष मस्जीद समितीने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत जोडली आहे हे सर्व कागदपत्र तपासून कार्यवाही करण्याचे आदेशीत केले आहे.

मा.सभापती : या संदर्भात कार्यवाही करण्याचे आयुक्तानी आदेशीत केले आहे संबधीत अधिकारी यांनी तेथील पाहणी करावी पुढील बैठकीत सविस्तर माहिती दयावी ती जागा मनपाने संपादीत केली आहे त्वरीत कार्यवाही करावी अधिकारी कार्यवाही करीत नसेल तर आयुक्तांनी त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.सिध्दांत सिरसाट : कार्यवाही केली नाही तर मी मा.कोर्टात पिटीशन दाखल करणार आहे.

श्री.मतीन सयद :शहांगज येथे दाट वस्ती आहे अशा ठिकाणी पेट्रोल पंप असणे योग्य नाही. अग्निशमन विभागाची एनओसी रद्य करावे तो पंप बंद करावा.

मा.सभापती : योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राजगौरव वानखेडे : 65 वाहन चालक संदर्भात सभागृहात चर्चा झाली कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते कार्यवाही केली नाही उलट त्याच अधिकारी यांना कामगार विभागाचा चार्ज दिला गेला.ते निर्दोष आहेत का ?

उपआयुक्त-म : 65 कर्मचारी संदर्भात संबधीत अधिकारी यांना नोटीस दिली होती त्यांचा खुलासा आल्यानंतर संचिका आयुक्ताकडे गेली होती यापुर्वी असे सांगितले की हे 65 चालक नवीन रिक्षा आल्या त्यांचेसाठी दयावे.संचिका परत आली ते कर्मचारी कोणत्या एजन्सीकडून घेतले असे विचारणा झाली.

श्री.राजगौरव वानखेडे : त्याच एजन्सीकडून जरी घेतले असेल तरी स्थायी समितीची मान्यता घेतली का नाही.

उपआयुक्त-म : प्रशासकीय मान्यता नव्हती म्हणूनच नोटीस दिली कामगार अधिकारी पदासाठी विधी पदवी आवश्यक आहे.त्यामूळे चार्ज दिला.

श्री.राजगौरव वानखेडे : अहवाल येत नाही तोपर्यत त्यांचा चार्ज काढावा.

मा.सभापती : सदस्यांनी सुचना केली त्याची दखल घ्यावी.संबधीत अधिकारी यांचेकडून चार्ज काढावा.

श्री.सयद मतीन :जुन्या शहरात सोनोग्राफी सेन्टर चालू करण्याचे आदेशीत केले होते एकही सेन्टर चालू नाही.ओल्ड सिटीतील कोणत्या डॉक्टराशी चर्चा केली.

आरोग्य वैद्य. अधिकारी :हे सेन्टर चालू होण्यासाठी जे खाजगी डॉक्टर आहे त्यांना ऑथराईज केलेले आहे व सर्व मनपाच्या सेन्टरला कळवून त्याचे केंद्रा अंतर्गत येणारे डॉक्टरना पत्र देऊन त्याचे डिटेल्स मागविण्यात यावे असे कळविले होते त्यानुसार 14 डॉक्टरांचे सेन्टरचे डिटेल्स आले.

आरोग्य अधिकारी : दर महिन्याच्या 9 तारखेला प्रधानमंत्री सुरक्षा योजना राबवितो त्यामध्ये सर्वांचा सहभाग घेऊन मोफत सुविधा देतो किती सेन्टर आहे माहिती मागविली आहे.

मा.सभापती : स.सदस्यांनी ठराविक जागा सांगावी तेथे सेन्टर सुरू करता येईल.

श्रीमती संगिता वाघुले : माझे वार्डात आरोग्य केंद्र आहे तेथे डॉक्टर नाही.संबधीतास बिल दिले नाही.

आरोग्य अधिकारी : डॉक्टरांची संख्या कमी आहे.बिलासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा लागेल बील दयायचे असेल तर मनपा फंडातून पेमेन्ट दयावे लागेल.

श्रीमती किर्ती शिंदे : समांतर मनपाने हस्तांतर केल्यानंतर तत्कालीन आयुक्त यांनी समांतर बाबत शॉर्ट प्लॅन व लाँग टर्म कार्यवाही करणेचे आदेशीत केले होते काय कार्यवाही केली.

कार्य.अभियंता-पापू : शार्ट टर्म करणेसाठी समांतर ची जी स्कीम चालू होती तीच कन्टीन्युव्ह करणे बाबत चालू आहे.

श्री.अजीम अहेमद : माझे वार्डात कन्टेमंशनचे काम होते पाणी प्रेशरने येत नाही तेथे अदयाप काम केले नाही पाच महिणे झाले.नेहरूनगर,कटकटगेट,शरीफ कॉलनी मुजीब कॉलनी पाणी येत नाही होते ते काम केले नाही आता सध्या 6-6 दिवसा पाणी येते.

श्री.राजगौरव वानखेडे :माझे वार्डात 30 वर्षापासून पाणी नव्हते आता मुबलक पाणी येत आहे अधिकारी यांचे त्याबदल अभिनंदन करतो.इतर वार्डातही पाणीपुरवठा सुरळीत करावे.

या वेळी स.सदस्य श्री.अजीम अहेमद व श्री.राजगौरव वानखेडे हे आपसात एकाच वेळी बोलतात.

मा.सभापती :स.सदस्य श्री.अजीम अहेमद, किर्ती शिदे यांचे वार्डातील पाण्याचा प्रश्न तसेच नेहरूनगर भागातही पाणी येत नाही तेथीलही प्रश्न सोडवावा.

श्रीमती किर्ती शिंदे :पाणीपुरवठयावर पाच वर्षात झालेला खर्च किती, 67-सी -3 मध्ये किती कामे केली आहे.जी कामे होत आहे त्यामुळे पाणी पुरवठ्यात फरक पडला काय? नक्षत्रवाडी येथे कंपनीचे गोडाऊन कुठे आहे कुठे पाईप ठेवण्यात येते. ते वापरात आणतात काय ? वापरात आणत असाल तर तरी सुध्दा पाणीपुरवठा सुरळीत नाही अशी नागरीकांची तक्रार आहे.

कार्य.अभियंता : संपूर्ण माहिती लेखी स्वरूपात दिली जाईल.समांतरचे काम होत नाही तोपर्यत पाणीपुरवठा सुरळीत होणे शक्य नाही.

श्रीमती किर्ती शिंदे : विदयुत पुरवठा होण्यास खंड पडणार आहे या बाबत पेपरला आले त्या बाबतीत मनपा प्रशासनाने पाणीपुरवठा करणेसाठी काय नियोजन केले.

मा.सभापती : याची कार्य.अभियंता पापू यांनी दखल घ्यावी.

श्रीमती शेख नरगीस : कटकटगेट,किराडपूरा सहीदा कॉलनी भागात गरीब लोक राहतात तेथे घाण पाणी येते क्रॉस कनेक्शन देण्याची कार्यवाही केली नाही.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :या बाबत पाहणी केली आहे 8-10 दिवसात काम होईल.

मा.सभापती : ड्रेनेज लाईनचे क्रॉस कनेक्शन तातडीने करावे.

श्रीमती संगिता वाघुले : माझे वार्डात काही पडीक विहिरी आहे त्या बुजविल्या जाव्यात.

मा.सभापती : सदस्यांची सुचना लक्षात घेऊन कार्यवाही करावी.तसेच आता विषय पत्रिका घेण्यात येत आहे. स्थायी समितीचे इतिवृत्त घेणेसाठी स्टेनो कर्मचारी नसल्याने इतिवृत्तात देता आले नाही.ज्यांनी इतिवृत्तांत घेतले ते आजारी आहे स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत घेणेसाठी एक स्टेनो कर्मचारी नगरसचिव विभागास देण्यात यावे.

**विषय क्र. 92 : (शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करीत आहेत की, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.65 महेशनगर अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रूपये 29,76,150/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.19/07/2017 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील नविन कॉंक्रीट रस्ते एस.सी. आर वार्ड क्र.07 पृष्ठ क्र.57 मध्ये अ.क्र.50 वर तरतुद उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,76,150/- मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.92 ते 98 मंजूर.

श्री.रेणुकादास वैद्य : अंदाजपत्रकास मंजूरी दयावी परंतु हे मंजूर केल्यानंतर त्या कामाचे भाग केले जातात. त्यामूळे पुन्हा स्थायी समितीकडे येत नाही तसे यापूढे होऊ नये. याची दखल घ्यावी.

मा.सभापती : स.सदस्यांची सुचना विचारात घेऊन कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.65 महेशनगर अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 29,76,150/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 93 : (शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करीत आहेत की, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.113 12 वी योजना शिवाजीनगर येथील कलावती शाळेजवळ रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रूपये 49,57,185/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.14/08/2017 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च मा.सर्वसाधारण सभेने दिनांक 20/05/2017 रोजी संपन्न झालेल्या विषय / ठराव क्र. 1044 अन्वये मंजुर केलेल्या अर्थसंकल्प सन 2017-2018 मध्ये सर्वसाधारण सभेने शिफारस केलेल्या शासन निर्णय अन्वये प्राप्त रक्कम रू.50.00 लक्ष तरतुद उपलब्ध आहे. करिता सदरील कामाचे अंदाजपत्रक र. रूपये 49,57,185/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.113 12 वी योजना शिवाजीनगर येथील कलावती शाळेजवळ रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.49,57,185/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 94 : (शहर अभियंता)**

प्रस्ताव सादर करीत आहेत की, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.65 विद्यानिकेतन कॉलनी अंतर्गत श्री.जाधव यांच्या घरासमोरील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रूपये 29,81,100/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.19/07/2017 अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील नविन कॉंक्रीट रस्ते एस.सी.आर. वार्ड क्र.07 पृष्ठ क्र.57 मध्ये अ.क्र.50 वर तरतुद उपलब्ध आहे. करिता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.29,81,100/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.07 अंतर्गत वार्ड क्र.65 विद्यानिकेतन कॉलनी अंतर्गत श्री.जाधव यांच्या घरासमोरील रस्त्याचे कॉंक्रीटींग करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.29,81,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 95 : (कार्य.अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.72, क्रांतीचौक अंतर्गत पन्नालालनगर ॲड.शिंदे यांचे घर ते वकील यांचे घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.29,87,943/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2017-18 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र.SCR-Ward-9 पान क्र.72 अ.क्र.22 वरील रक्कम रू.20.00 लक्ष या उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.29,87,943/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.72, क्रांतीचौक अंतर्गत पन्नालालनगर ॲड.शिंदे यांचे घर ते वकील यांचे घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.29,87,943/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 96 : (कार्य.अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.72, क्रांतीचौक अंतर्गत न्यु उस्मानपुरा येथे सावंत यांचे घरापासून ते निलंगेकर यांचे घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 च्या दरसुचीनुसार रक्कम रू.39,96,982/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन 2017-18 च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात नविन कॉंक्रीट रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत पान क्र.SCR-Ward-9 पान क्र.71 अ.क्र.21 वरील रक्कम रू.40.00 लक्ष या उपलब्ध तरतुदीमधुन करण्यात येणार आहे. अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणेबाबत शिफारस आहे.

करीता प्रस्तावित कामाच्या रक्कम रू.39,96,982/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.72, क्रांतीचौक अंतर्गत न्यु उस्मानपुरा येथे सावंत यांचे घरापासून ते निलंगेकर यांचे घरापर्यंतच्या रस्त्याचे कॉंक्रीटींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.39,96,982/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 97 : (कार्य.अभियंता)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.02 अंतर्गत असलेल्या शंभुराजे चौक ते राजे शिवाजी चौक (वडाच्या झाडापर्यंत) 80 फुट डी.पी. रस्त्याचे खडीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.39,91,015/- च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. सदरील कामाचे

अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची 2015-16 नुसार तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च प्रस्तावित 2017-18 नविन कॉंक्रीट रस्ते या अंतर्गत करण्यात येणार आहे.

तरी सदरील कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.39,91,015/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

